फेर जाहीर नोटीस

दि.०४/०७/२०२६ रोजी मंजूर केलेल्या टिप्पणीस अनुसरुन तमाम पुस्तक विक्रेते यांस याद्वारे कळविणेत येते की, जिल्हा न्यायालयातील सर्व न्यायीक अधिकारी यांचे वाचनाकरीता जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे सुरु करणेत आलेल्या 'जजेस लायब्ररी' साठी पुस्तके खरेदी करावयाची असल्याने नव्याने दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती

१) दरपत्रक वरीलप्रमाणे आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर **' पुस्तकांचे दरपत्रक '** असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रकामध्ये पुस्तकांची किंमत, त्यावर दिलेली सुट, लेखक, सेवाकर, इ. बाबी स्वतंत्र नमुद कराव्यात.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) पुरविणेत आलेली पुस्तके ही चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहेत. पुस्तके खराब अथवा फाटलेली असल्यास ती पुस्तके बदलून देण्याची व्यवस्था संबंधित विक्रेत्यांनीच करावयाची आहे.

५) सर्वात कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

६) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

७) खरेदी करणेत आलेली पुस्तके कार्यालयात पोचविण्याची जबाबदारी विक्रेत्यांवरच राहील. सर्व पुस्तके प्राप्त झाल्यानंतरच देयकाची रक्कम कोषागारामार्फत अदा करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.

८) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुक विक्रेत्यांनी वरील अटी व शर्तीस अधीन राहून **दि. १७/०७/२०२६** पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे सादर करावीत.

दिनांकः- १०/०७/२०२६

सहाय्यक अधीक्षक(वित्त)
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

*****

म.जा.क्र.ग्रंथा./४५७९सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस
दिनांकः- १०/०७/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर-

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई-मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता